ISSN : 2231 4377

SAKSHAM SAMIKSHA


त्रैमासिक

# सक्षम समीक्षा

मराठी भाषा-वाङ्मय व संशोधन यासाठी असलेल्या मंच

संपादक : प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन

वर्ष : ८ वे अंक : दुसरा
जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०१८



वितरण क्षेत्र : दिल्ली, पश्चिम बंगाल (कलकत्ता), उत्तर प्रदेश (वाराणसी), कर्नाटक, गोवा, गुजरात (बडोदा), हैदराबाद, पुणे, नगर, नाशिक, मुंबई, ठाणे, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, गुहागर, कोल्हापूर, सातारा, सांगली, कराड, सोलापूर, लातूर, परभणी, जालना, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, अकोला, नांदेड, जळगाव, धुळे, नंदुरबार, चंद्रपूर, गडचिरोली, वाशिम, भंडारा, वर्धा.

Scanned with CamScanner

# अंतरंग


| | |
|---|---|
| १) तौलनिक साहित्य आणि वाङ्मयेतिहास | प्रा. डॉ. निशिकांत मिरजकर (पुणे)..........४ |
| २) आदिवासी संस्कृती | प्रा. डॉ. भौमिक देशमुख (पुणे) ............ १३ |
| ३) आदिवासी संस्कृती मधील रूढी परंपरा व नीतिनियम | प्रा. डॉ. संजय घोडेकर (पाबळ) .......... १६ |
| ४) आशादायक समाजचित्र उभारणाऱ्या कथा | प्रा. डॉ. कीर्ती मुळीक (पुणे) ............ १८ |
| ५) 'मन्हा गावले' बोलीतील काव्यनिर्मितीचा आश्वासक | प्रा. डॉ. योगिता पाटील (धुळे) .......... २१ |
| ६) उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह | प्रा. डॉ. शीला गाढे (कोपरगाव) ......... २३ |
| ७) आजच्या मराठी कादंबरीतील सांस्कृतिक पर्यावरण | प्रा. डॉ. महेश खरात (औरंगाबाद).........२४ |
| ८) हिंदू-मुस्लीम संस्कृतीतील एकात्मता | प्रा. डॉ. ताहेर एच. पठाण (अलिगड) ....३२ |
| ९) संघर्षगाथा एका आईची..... | प्रा. डॉ. राजाराम गावडे (इंदापूर) ........ ३५ |
| १०) वाचकांच्या अंतर्मनाचा वेध घेणारी कादंबरी | प्रा. सुशांत जाधव (कोल्हापूर) ............३७ |
| ११) साहित्य आणि समाज (दलित साहित्याच्या संदर्भात) | प्रा. डॉ. विजय केसकर (वालचंदनगर).....३९ |
| १२) १९८० नंतरचे ललित गद्य लेखन | प्रा. डॉ. संभाजी मलगे (तळेगाव) .........४० |
| १३) दिगंबर पाध्ये यांचे समीक्षा लेखन | प्रा. डॉ. नामदेव गपाटे (वाराणसी).........४२ |
| १४) १९४७ नंतरची ग्रामीण कादंबरी : काही निरीक्षणे | प्रा. डॉ. दया जेठे (अहमदनगर) ............४८ |
| १५) मातंग संज्ञेचा अर्थ | प्रा. अविनाश तायडे (पुणे) ..................५० |
| १६) विठो रखुमाय – स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून... | सचिन म्हस्के (मुंबई) .......................५२ |
| १७) चित्रपटातील भाषाशैली | प्रा. संजय मोरे (पुणे) .........................५६ |
| १८) सार्वजनिक ग्रंथालयाची सद्यस्थिती – एक शोध | तृप्ती सुभाष अंब्रे (पुणे) ......................५९ |
| १९) जी.ए.चा 'निळा सावळा' वास्तविकतेचे साद-पडसाद' | प्रा. सुनिता अत्रे (श्रीरामपूर).......................६२ |
| २०) लीळाचरित्र व सूत्रपाठ | वंदना आकाशकर (पुणे) ......................६४ |
| २१) फेसाटी : एका सामान्य स्खलनशील जीवाची कथा | प्रा. प्रबंधिका शेलार (अहमदनगर) .........६९ |
| २२) मराठी नाटक आणि वसंत कानेटकर | डॉ. पी. जी. कुलकर्णी (पुणे) ..............७२ |
| २३) साहित्याचे वर्तमानकालीन स्वरूप मांडणारा ग्रंथ | प्रा. तुषार भोसले (पुणे) ......................७४ |
| २४) मनोरंजन व्यापारी : बंगाली साहित्यातला नवचेतनेचा | प्रा. डॉ. सुमेध रणवीर (कलकत्ता) .........७६ |
| २५) प्रवासवर्णन: एक ललित साहित्यप्रकार | सौ. सीमा शेळके - पावडे (सासवड) .....७९ |
| २६) दलित भाषेचे उत्कृष्ट चित्रण करणारे – आत्मकथन | प्रा. वनिता शिंदे (कोल्हापूर) ...............८१ |
| २७) नाथामास्तर घोडेगावकर यांच्या वगनाट्यातील व्यक्तिरेखा | गणेश चौधरी (पुणे) ..........................८५ |
| २८) कविता महाजन यांच्या कादंबऱ्या | डॉ. किशोर सानप (अमरावती) ............९० |
| २९) भालचंद्र नेमाडे यांचे जातीयतेसंबंधीचे विचार | प्रा. संजय सिंगनजुडे (नागपूर) ............९८ |
| ३०) कादंबरीचे चित्रपट माध्यमांतर | डॉ. सौ. जयदेवी पवार (लातूर) ............१०१ |




Scanned with CamScanner



प्रा. डॉ. राजाराम गावडे
मराठी विभाग प्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय
इंदापूर, जि. पुणे
मो. ८९७५५६९९८५

चरित्र लेखन हे एकाच वेळी शास्त्र आणि कला या दोन्हींच्या सुंदर मिश्रणाने तयार होणारी एकात्म साहित्यकृती असते हे चरित्रग्रंथाच्या अभ्यासाने लक्षात येते. चरित्र ज्या सत्याचा शोध घेते ते सत्य सामान्यतः सुंदर असते याची जाणिव असल्याने त्याच्या कलात्मक प्रेरणेस तो मोठाच आधार असतो. सत्याची निवड चरित्रात अपरिहार्य आणि आवश्यक असते. चरित्रातील वातावरण, निसर्ग किंवा समाज यापेक्षा व्यक्तिंमुळे चरित्र अधिक जिवंत होते. याचा प्रत्यय 'माझ्या हिरकणीची वाट' हे चरित्र वाचत असताना येते. अनेक अडथळ्यांवर मात करून अनेक संकटांचा सामना करत सगळ्या वाटा बंद झाल्या, तरी न डगमगता, न थकता लेकरांसाठी नव्या वाटा शोधणाऱ्या, प्रसंगी नव्या वाटा निर्माण करणाऱ्या, एका त्यागी, सहनशील, हिंमतवान, चिवट आईची कहाणी म्हणजे 'माझ्या हिरकणीची वाट' हे चरित्र प्रकाशित केले. हे चरित्र पुणे येथील स्नेहवर्धन प्रकाशनाने प्रकाशित केलेमहाराष्ट्रामध्ये सुमारे साडेतीनशे वर्षांपूर्वी महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या, शिवकाळात रायगडाच्या सर्ववाटा बंद झाल्यावर आपल्या लेकरांसाठी, त्यांच्या ओढीने नव्या वाटा शोधणाऱ्या एका हिरकणीचा सत्कार शिवरायांनी केला होता. सर्व स्त्रीजातीचा आदर करणाऱ्या महाराजांनी ज्या बुरुजांवरून ही स्त्री खाली उतरली, त्या बुरुजाला 'हिरकणीचा बुरुज' असे नाव देऊन त्या हिरकणीला अजरामर केले. समाजव्यवस्थेने स्त्रियांचे अस्तित्व नाकारलेल्या काळात स्त्रीचा केलेला सत्कार स्त्रियांच्या प्रती असलेला आदर दाखवून जातो.

महादेव वाळुंज यांनीही आपल्या आईचे जे लक्ष्मीबाईचें चरित्र लिहिले आणि चरित्राला 'माझ्या हिरकणीची वाट' असे अर्थपूर्ण नाव दिले. साडेतीनशे वर्षांपूर्वीची हिरकणी आणि तिचा तिच्या लेकरांसाठीचा संघर्ष आणि २० व्या शतकातील लक्ष्मीबाई या दोघींचा संघर्ष आणि धडपड सारखीच आहे. हे. लक्ष्मीबाईनी आपल्या मुलांच्यासाठी सोसलेला सासुरवास, हालअपेष्टा दोन्हीही सारख्याच आहेत. 'माझ्या हिरकणीची वाट' या नावाने चरित्र लिहून आपल्या आईला चिरंजीवित्त्व प्राप्त करून देणारे महादेव वाळुंज आणि शिवरायांनी सत्कार केलेली हिरकणी हा अत्यंत दुर्मीळ योगायोग आहे. लक्ष्मीबाई वाळुंज यांनी सोसलेले दुःख, दारिद्रय, अपमान, हिंमत न हारता केलेल्या संघर्षाची जाणीव ठेवत महादेव वाळुंज यांनी अत्यंत संवेदनशील मनाने शब्दबध्द केलेली करुण कहाणी आहे. हे चरित्र ज्या रसिकांनी वाचले त्या सर्वांच्या त्या आई झाल्या आहेत. डॉ. वाळुंज म्हणतात "खरेतर हे केवळ माझे व माझ्या आईचे जीवन नाही, तर आमचे आहे. या आमच्यामध्ये आईच्या सासरची व माहेरची सर्व माणसे, शेजारी, मित्र, नातेवाईक या आमच्या गोतावळ्यांचा समावेश आहे." डॉ. वाळुंज यांचे हे जे 'आमचं' आहे त्या आमच्यात आम्ही कधी शिरकाव केला ते कधी आपलं झालं, हे समजलंच नाही. प्रसिध्द उद्योजक श्री. वेणूगोपाल धूत म्हणतात, "चरित्र, आत्मचरित्र म्हणजे प्रत्येकाचे जिवन समृध्द करणारा एक बिलक्षण खजिना आहे. या गुहेत प्रवेश केला की, सर्वत्र रत्नांचेच दर्शन होते. देश वेगळा, भाषा वेगळी, कालखंड वेगळा असलेही, पण मानवी प्रवृत्ती आणि संघर्ष तेच आहेत. या खजिन्यात प्रत्येक टप्प्यावर कोणीतरी सखा, सांगाती, मार्गदर्शक भेटतोच." 'माझ्या हिरकणीची वाट' हे चरित्र वाचत असताना प्रत्येक टप्प्यावर या उक्तींचा परिचय येतो. लक्ष्मीबाईनी आयुष्यभर चिकाटीने संसार केला. मनसोक्त, मनमुराद, भरभरुन असे कधीच काही त्यांना मिळालं नाही; पण एक गोष्ट मात्र भरभरुन मिळाली ते म्हणजे दुःख, दारिद्रय, दैना. त्यामुळे जे काही मिळाले ते जिवापाड जपलं. दोन रुपये रोजाने केलेले काम, यामुळे जे मिळेल ते साठवायचं, जपायचं, सगळं संपवायचं नाही. भविष्यासाठी साठवून ठेवायचे हा लक्ष्मीबाईच्यां जगण्याचा अविभाज्य घटक बनला होता. अर्थात या संघर्षातून त्यांचे व्यक्तिमत्व घडत गेले. हेच संस्कार त्यांनी आपल्या मुलांवरही केलेले आहेत. अनेक संकटे आली, तरी डगमगायचे नाही. आपल्या मुलांसाठी लढा द्यावयाचा. मान-अपमान गिळत उद्याच्या भविष्याचे स्वप्न पहायचे आणि जगायचे. कारण भग्न स्वप्नांच्या तुकडयांना कवटाळून बसण्यासाठी मनुष्य जन्माला आलेला नाही. त्याला भूतकाळाच्या गरुड पंखाचे वरदान लाभलेले आहे. एखादं स्वप्न पाहणं ते फुलविणं




स्नेहवर्धन प्रकाशन पुणे,
प्रथमावृत्ती – २५ ऑक्टो. २०१२, पृष्ठ संख्या – १२५
किंमत – १००/–



Scanned with CamScanner

दुर्दैवाने ते भंग पावलं, तरी एका स्वप्नापाठी मागून दुसऱ्या स्वप्नांच्या पाठीमागे रक्ताळलेल्या पायांनी धावणे यालाच जीवन असे म्हणतात. या ओळी वि.स.खांडेकर यांच्या 'अमृतवेल' कादंबरीतील आहेत. 'अमृतवेल' ही कादंबरी काल्पनिक आहे. पण 'माझ्या हिरकणीची वाट' मात्र खऱ्या-खुऱ्या हाडांमासांच्या जीवन जगलेल्या स्त्रीची वास्तव आणि दाहक कहाणी आहे. प्राध्यापक अ. म. जोशी म्हणतात, ''आपणांस प्रिय असलेल्या किंवा आदरणीय वाटणाऱ्या व्यक्तींबद्दल प्रेम व आदर व्यक्त करणे याप्रवृत्तीतूनच चरित्र लेखनाच्या प्रथेचा जन्म झाला.'' डॉ. वाळुंज यांनी या चरित्रामधून आपल्या आईबद्दल प्रेम आणि आदर व्यक्त केलाच पण त्यांना ज्यांनी ज्यांनी त्रास दिला अशांच्या बद्दल ही कुठेही कटूता व्यक्त केली नाही.

लक्ष्मीबाई भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ या तिन्ही काळावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारी एक स्त्री आहेत. माहेरी सुखाबाई म्हणजे सुखाचे आगर आणि सासरी लक्ष्मीबाई अशी अर्थपूर्ण नावे धारण करुन देखील सुख व समाधान आलेल्या संकटांमुळे कायम दूर गेले. कधी एका जागी बसणं नाही किंवा ते त्यांच्या स्वभावातच नव्हते. परिस्थितीने त्यांना कधी स्वस्थ बसू दिले नाही. ती सवयच लागू दिली नाही. रोज नव्या काळज्या, चिंता, ढोर कष्ट अशा अनेक धडपडीने त्यांचे जीवन ओतप्रोत भरले आहे. अशा आईची अतिशय वेदनामय, संघर्षमय कहाणी ऐकताना आणि वाचताना अनेक वेदना होतात. परंतु जीवन म्हणजे काय असते! ते सुखकर कसे करायचे, याची एक प्रेरणाही मिळते सरदवाडी हे मूळगाव वडिलांनी वडगाव रासाईचा चांगला बारदाना म्हणजे नदीकडेचे गाव पाहून लग्न करुन दिले. उंबऱ्यातील भरलेले माप ओलांडून वाळुंजाच्या घरात प्रवेश केला. प्रवेशापासून संघर्षाला सुरुवात झाली. मराठी चित्रपटातील सासू आणि प्रत्यक्षातील सासू यामध्ये काही फरक नव्हता. घरातील सर्व कामे करण्यास सुरुवात झाली. सासुरवास काय असतो याची झलक पहायला मिळाली. उपाशी रहाणे, अनेक न पेलतील अशी कामे करणे, आई-वडीलांचा सासूकडून होणार उध्दार हे सर्व नित्याचेच होऊ लागेल. गुराढोरांसारखा मार खाणे. मन बधिर होऊन सर्व सहन करण्याशिवाय पर्याय नव्हता. प्रश्न पडत होते; पण उत्तरे देणारे कोणीही नव्हते जगाशी चांगलं वागणारी ही माणसं आपल्याशीच अशी का वागतात हे मात्र समजत नव्हते. पहिला मुलगा सुरेशचा जन्म झाल्यावर, तरी सासरच्या लोकांमध्ये फरक पडेल असे वाटत होते. पण पहिल्यासारखीच परिस्थिती, सुरेशच्यापाठी जया, जयाच्यापाठी सोमवारी जन्माला आलेला महादेव म्हणजे स्वत: लेखक महादेव वाळुंज आणि सर्वात लहान रमेश अशी चार अपत्ये झाली. लक्ष्मीबाई ज्या हाल अपेष्टा सहन करत होत्या, अगदी तशाचा थोडयाफार त्यांच्या मुलांच्याही वाटयाला आल्या. संसाराच्या मध्यावर पती पंढरीनाथ वाळुंज यांचा झालेला मृत्यू तर, अनेक अडचणी निर्माण करुन गेला. भरल्या संसारातून काही दिवस का होईना आता आपले वाईट दिवस सरुन जाऊन उदयाचा उज्वल भविष्यकाळ निर्माण होईल, हे पाहिलेले स्वप्न अर्ध्यातच मोडून पडले. पंढरीनाथ यांच्या मृत्यूने एक चिरा निखळून पडला. सासरी अनेक अडचणींना तोंड देणारी लक्ष्मीबाई मात्र, कोणत्याही गोष्टींनी खचून जाणारी नव्हती. कारण ती जातीवंत हिरकणी होती.

या हिरकणीला साथ देणारी, हत्तीचे काळीज असणारी माणसं, आपल्या पिलांवर मायेची पाखर घालणारे आई-वडील, चुलते, भाऊ-भावजया यांची मात्र मोलाची साथ होती पंढरीनाथ वाळुंज यांच्या मृत्यूनंतर माहेरी आलेली लक्ष्मीबाई आणि त्यांची मुले यांचा जीवनप्रवास नव्याने सुरु झाला. सासरची वाटयाला आलेली शेती, सुगी करणे, पेरणी करणे, कोळेकरांचे सहकार्य, ट्रक पलटी होणे, पेरणीसाठी रात्रीचे निघणे, सासर ते माहेर असे ४० कि.मी. अंतर तेही बारा वर्षे बैलगाडीने प्रवास करुन कापणे सुरु होते जीवनातील या सर्व घटनांची मालिका थक्क करुन सोडते. आपल्या शेतीचे जंगल होऊ नये म्हणून भावंडांनी दिलेली लाखमोलाची साथ अत्यंत महत्त्वाची ठरते. महादेव वाळुंज हा प्रसंग शब्दबध्द करताना लिहितात. 'उन, वारा, पाऊस या साऱ्यांनी असंख्य अडथळे आणले, त्यांची तमा न बाळगता, या सगळयांषी टक्कर देत, माझ्यासाठी, माझ्यासाठी, माझ्या संसारासाठी, माझ्या षेतासाठी माझे भाऊ लढले, संघर्ष केला आणि सगळं राखलं, संसार, शेत......' '' लक्ष्मीबाईच्या जीवनप्रवासात मोलाची साथ देणारे असे भाऊ एकमेकाव्दितीयच म्हणावे लागतील. माहेरचे हे लोक लक्ष्मीबाई त्यांची मुले आणि शेती या सर्वांना सांभाळत होते. खरेतर भावंडांनी रानाची अत्यंत चांगली वहिवाट केली, त्यांच्या मुलांसोबत याही मुलांवर चांगले संस्कार केले. म्हणून आज हे दिवस पहायला मिळाले ही भावांच्याबद्दल, आई-वडिलांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करायला लक्ष्मीबाई विसरल्या नाही. १९८० साली माहेरच्या घरावर आलेले मोठे संकट म्हणजे पडलेला दरोडा चोरांनी केलेली जीवघेणी मारहाण. चोरांनी लुटलेला ऐवज पुन्हा ही कटकट नको म्हणून, 'जे गेले ते गेले आपलं नव्हतं म्हणून सोडून द्यायचे' ही सामंजस्याची भूमिका या सर्व गोष्टी अत्यंत विचारी वाटतात. लक्ष्मीबाई स्वत:च्या आईबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना म्हणतात, ''माझी आई सुख-दु:खात सर्वात जवळची सखी, सोबतीण, गुरु, मार्गदर्शक सर्व काही होती. आतापर्यंत मी जे भोगलं ते सारं आईच्या मायेनं, आधारानं सोसलं, आईच्या विश्वासावर, प्रेमावर स्वत:ला पुढच्या लढाईला तयार केलं. अशी माझी आई, आम्हा भावडांची गुरु होती. तिच्या जाण्याने फार मोठी पोकळी निर्माण झाली.'' असे असले, तरी आबा म्हणजे वडील दु:ख पिऊन टाकणाऱ्यांपैकी एक होते. स्वत:च दु:ख विसरुन आम्हाला आधार देणारे. मायेची पाखर घालणारेही आबाच होते ही सर्व माणसे एकमेकाला बोलायची, (पान नं. ४१ वर)



Scanned with CamScanner